**फौ.कि.अ.क्र.४६९/२०२२**

संग्राम वि. सरकार

**निशाणी क्र. १ वरील आदेश**

(सीएनआर.नंबर.एमएचपीयु.१८-००२२०७-२०२२)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ अन्वये दौंड पोलिस स्टेशन येथील गु.र.क्र.४०२/२०२२ मध्ये जप्त केलेला मुद्देमाल परत मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जाचे कामी अर्जदाराचे कथन की, पोलिसांच्या ताब्यातील टाटा मोटर्स लि. कंपनीची एलपीके १६१८ गाडी नं.-एम.एच.४२ टी ०६३४, चासी नं.MAT449024C3P34479 इंजिन नं.- BS91803221L63300987 असुन हा अर्जदार यांच्या मालकीची आहे. सदरचे वाहन दौंड पोलिसांनी गु.र.नं.४०२/२०२२ अन्वये गुन्हा दाखल करुन गुन्ह्याच्या तपास कामी जप्त केलेली आहे. अर्जदार कथन करतो की, वर नमुद मुद्येमाल पोलीस स्टेशनमध्ये पडुन असुन खराब होण्याची शक्यता आहे. तरी वर नमुद मुद्येमाल अटी व शर्तीवर अर्जदार यास परत दिलेस अर्जदार न्यायालयाने घालुन दिलेल्या अटी पाळण्यास तयार आहे.

३. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आडसकर यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे प्रस्तुत अर्जावर दाखल केले आहे की, प्रस्तुतचा मुद्देमाल हा गुन्ह्याचे तपास कामी जप्त केला असुन सदर वाहन गुन्ह्यामध्ये वापरण्यात आलेला आहे व त्यामुळे सदर मुद्देमाल पुराव्याचा भाग आहे. करिता सदर मुद्देमालाबाबत मे. न्यायालयाने कायद्यातील तरतूदीनुसार आदेश पारीत करावा. अर्जाचे कामी तपासी अंमलदार यांनी नि. ६ वर म्हणणे दाखल केले आहे की, वर नमुद वाहन पुन्हा अशाच प्रकारच्या गुन्हयात वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. प्रस्तुतचा अर्ज, तपासी अधिकारी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच अर्जदार यांच्या कथनाचे अवलोकन केले. प्रस्तुत गुन्ह्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार याने अर्जाचे कामी नि ३/२ वर अर्जदार यांचे वाहनाची आर.सी.बुकची व नि. ३/१ वर अर्जदाराने त्यांचे आधारकार्डची प्रमाणीत प्रत व नि. ३/३ वर अर्जदार यांनी विकत घेतलेल्या वाहनाचा नोटरी दस्तची प्रत दाखल केला आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदरच्या वाहनाचे मालक अर्जदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. सदरचे जप्त मुद्देमाल गुन्ह्यासंदर्भात वापर झालेला आहे किंवा नाही ही बाब अभियोगपक्षाचा पुरावा पुर्ण होईपर्यंत सिध्द होणार नाही. आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला वाहन हे प्रस्तुत केसचा न्यायनिर्णय होईपर्यंत पोलीस स्टेशनमध्ये पडुन राहिल्यास खराब होऊ शकते. तसेच प्रस्तुत अर्जदाराचा अर्ज मंजूर केल्यास न्यायालयाने घातलेल्या अटींची पूर्तता व पालन करण्यास अर्जदार तयार आहे. सबब सदरचा अर्ज मंजुर करण्यास कोणताही अडथळा दिसुन येत नाही, परंतु सदरचे वाहन हा गुन्ह्याकामी वापरला गेला असल्याने काही अटी लादणे न्यायोचित ठरते. करिता पुढीलप्रमाणे

आदेश पारित करत आहेः

## आदेश

१. अर्जदाराचा मुद्देमाल टाटा मोटर्स लि. कंपनीची एलपीके १६१८ गाडी नं.–एम.एच.४२ टी ०६३४, चासी नं.MAT449024C3P34479 इंजिन नं.– BS91803221L63300987 असा अर्जदारास खालील अटींवर देण्यात येत आहेः

अ) अर्जदाराने रुपये १०,००,०००/– चे बंधपत्र तपासी अधिका–यांकडे जप्त मुद्देमाल वाहना संदर्भात द्यावयाचे आहेत.

ब) अर्जदाराने गु.र.नं. ४०२/२०२२ चा न्यायनिर्णय होईपर्यंत प्रस्तुत वाहनाची विक्री अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण करावयाचे नाहीत. त्याचप्रमाणे वाहनाचा रंग खराब करणे बदलणे अशा प्रकारे वाहनाच्या स्वरुपात कोणताही बदल करावयाचा नाही.

क) प्रस्तुतचा वाहन न्यायालय गुन्ह्याच्या कामी ज्यावेळी हजर करावयास सांगेल त्यावेळी त्वरीत हजर करावयाचे आहे.

२. तपासी अधिकारी, दौंड पोलीस स्टेशन यांना आदेशीत करण्यात येत आहे की, टाटा मोटर्स लि. कंपनीची एलपीके १६१८ गाडी नं.–एम.एच.४२ टी ०६३४ वाहनाचे चारही बाजुने रंगीत छायाचित्र घेऊन पंचनामा करुन सुपूर्दनाम्यासह न्यायालयात त्वरीत हजर करावयाचे आहेत.

३. सदर आदेशाची प्रत दौंड पोलीस स्टेशन यांना पाठवावी.

ठिकाणः दौंड,
दिनांकः १३/१०/२०२२.

**(ए.जी.कुलकर्णी)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ४, दौंड
ता. दौंड, जि. पुणे.

<u>शेरा</u>

मी शपथेवर सांगते की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :: | आर.आर.क्षिरसागर |
| कोर्टाचे नांव | :: | ए.जी.कुलकर्णी<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र.४. दौंड,<br>ता. दौंड, जि.पुणे |
| दिनांक | :: | १३/१०/२०२२. |
| पिठासीन अधिका–याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :: | १३/१०/२०२२. |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :: | १३/१०/२०२२. |